# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 08 January 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०८ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- दोन टप्प्यात होणाऱ्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी
- अपघातग्रस्तांना रुग्णालयात नेणाऱ्या व्यक्तीला २५ हजार रुपये बक्षीसाची घोषणा
- अंबरनाथ इथं कॉंग्रेसच्या निलंबित १२ नगरसेवकांचा भाजप प्रवेश–कॉंग्रेसची टीका
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात येत्या रविवारी पहिला केंद्रीय लोककला महोत्सव

आणि

- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पी व्ही सिंधूचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

****

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना आज जारी करण्यात आली. या वर्षी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीत देशातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये घरांची गणना करण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्येची गणना होईल. मोबाइल ॲपद्वारे केली जाणारी ही देशातील पहिली जनगणना असेल.

****

निवडणूक आयोगाने देशात बिहारसह इतर अनेक राज्यांमध्ये हाती घेतलेल्या मतदार याद्या विशेष पुनरीक्षण फेर–पडताळणी कार्यक्रमाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात येत्या मंगळवारी अंतिम सुनावणी सुरू होणार आहे. सुनावणीची प्रक्रिया १३ जानेवारी रोजी पुन्हा सुरु होईल, असं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं म्हटलं आहे.

****

अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचवणाऱ्या व्यक्तीला आता २५ हजार रुपये बक्षीस मिळणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सदर जखमी व्यक्तीला रोखरहित उपचार दिले जाणार असल्याचंही गडकरी यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – केंद्रीय रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी**

****

बनावट सरकारी नोकरी घोटाळ्यात संशयित असलेल्या संघटित टोळीविरोधात सक्तवसुली संचालनालयाने देशभरात धाडसत्रं सुरू केली आहेत. सहा राज्यातील १३ शहरांमधल्या १५ ठिकाणी ही कारवाई केली जात असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

अंबरनाथ नगरपालिकेतल्या काँग्रेसच्या नवनिर्वाचित प्रदीप पाटील यांच्यासह १२ नगरसेवकांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत नवी मुंबईत हा पक्षप्रवेश सोहळा झाला. भाजपासोबत युती केल्यानं काँग्रेसनं काल या सर्वांना निलंबित केलं होतं. काँग्रेसनं आपल्याला विश्वासात न घेता थेट कारवाई केल्याचा आरोप प्रदीप पाटील यांनी केला होता.

भाजपच्या या पक्ष प्रवेश सोहळ्यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कडाडून टीका केली. ते आज जालना इथं प्रसारमाध्यमांशी बोलत होते. सत्तेसाठी भाजपा कोणत्याही पक्षाशी युती करत असून, काँग्रेसमुक्त भारत करण्याच्या नादात भाजपाच काँग्रेसयुक्त झाल्साची टीका सपकाळ यांनी केली. सदर प्रकार हा पूर्णपणे बेकायदेशीर असून या सर्व १२ नगरसेवकांचं सदस्यत्व रद्द करण्यासाठी कायदेशीर कारवाई करणार असल्याचं काँग्रेसकडून सांगण्यात आलं आहे.

****

मुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं प्रचार सभा घेतली. चिकलठाणा परिसरात फडणवीस यांनी संबोधित केलं, त्यांचं हे संबोधन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शहरातल्या बहुतांश प्रभागांमध्ये प्रसारित झालं.

अहिल्यानगर इथंही मुख्यमंत्री तथा भाजप नेते फडणवीस यांनी महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचारसभेला संबोधित केलं. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा आदर्श मानून आपणही राज्यकारभार सुसज्ज करणार, असं फडणवीस यांनी सांगितलं.

****

महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मतदानासाठी मतदार ओळखपत्रासह १२ पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने ही माहिती देण्यात आली. यामध्ये पासपोर्ट, आधार ओळखपत्र, वाहन चालवण्याचा परवाना, आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र, केंद्र शासन, राज्य शासन, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहित दिलेली ओळखपत्रे, राष्ट्रीयकृत बँका अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराची छायाचित्रासह असलेली खातेपुस्तिका, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहीत अपंगत्वाचा दाखला, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील फोटो असलेले ओळखपत्र, निवृत्त कर्मचाऱ्यांचे अथवा त्यांच्या विधवा, अवलंबित व्यक्ती यांची फोटो असलेली निवृत्ती वेतन विषयक आदी कागदपत्रांचा या पुराव्यांमध्ये समावेश आहे.

****

छत्रपती संभाजीनगरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा पहिला केंद्रीय लोककला महोत्सव येत्या ११ आणि १२ जानेवारीला होणार आहे. विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ.कैलास अंभुरे यांनी ही माहिती दिली. यात चार रंगमंचावर ११ कलाप्रकार सादर होणार असून ३७७ कलावंत सहभागी होणार आहेत, या महोत्सवात चार जिल्ह्यातल्या संलग्नित महाविद्यालयांचे ६१ संघ, तर विद्यापीठ आणि उपपरिसराचा प्रत्येकी एक संघ असे एकूण ६३ संघ सहभागी होणार आहेत.

****

मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधूने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. तिने जपानच्या तोमोको मियाजाकी हिचा २१-८, २१-१३ असा पराभव केला. उपांत्य फेरीत सिंधूचा सामना जपानच्या अकाने यामागुची हिच्यासोबत होईल. या स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत जाण्याची सिंधूची ही चौथी वेळ आहे.

****

केंद्र सरकारनं नुकतंच पारित केलेल्या विकसित भारत जी राम जी योजनेत ग्राम पंचायत शिवारातच नागरिकांना काम मिळत आहे. त्यामुळे या योजनेचा सर्वसामान्य नागरिकांना चांगला फायदा झाल्याची प्रतिक्रिया धाराशिव जिल्ह्यातल्या उपळे माकडाचे गावचे लाभार्थी श्रीकांत जोशी यांनी दिली. ते म्हणाले -

**बाईट – श्रीकांत जोशी**

****

केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण विषयक संसदीय स्थायी समितीच्या वतीने चेन्नई इथं रेल्वेमार्गाद्वारे अन्नधान्य वाहतूक हालचाल अधिक कार्यक्षम करण्याबाबत बैठक झाली. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी सहभाग घेतला. रेल्वेमार्गाने अन्नधान्य वाहतूक अधिक कार्यक्षम करावी, याविषयी त्यांनी अनेक महत्वाचे मुद्दे मांडण्यात आले.

****

धुळे सोलापूर महामार्गावर कन्नड घाटात भाविकांच्या गाडीला भीषण अपघात होऊन तीन जणांचा मृत्यू झाला तर ४ जण गंभीर जखमी झाले. अहिल्यानगर जिल्ह्यातल्या शेवगाव इथले काही भाविक खाजगी वाहनाने उज्जैनला जात होते, या घाटात चालकांचं गाडीवरचं नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाल्याचं सांगितलं जात आहे.

****

बालविवाह मुक्त भारत या उपक्रमानिमित्त आज हिंगोली इथं आदर्श महाविद्यालयात बालविवाह प्रतिबंधाबाबत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात बाल कल्याण समितीचे अध्यक्ष सुधाकर इंगोले यांनी उपस्थितांना बालविवाह न करण्याची आणि रोखण्याची प्रतिज्ञा दिली.जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. दरम्यान, हिंगोली तालुक्यातल्या कलगाव इथंही खंडोबा आणि येडोबा यात्रेनिमित्त बालविवाहाबाबत जनजागृती करण्यात आली.

****

नांदेड जिल्ह्यात माहूर इथल्या रेणुकादेवी संस्थानच्या सेवेत गेल्या ५ वर्षांपेक्षा जास्त काळ असलेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याचा निर्णय विश्वस्त मंडळानं घेतला आहे. या निर्णयानुसार ६४ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ नियुक्ती पदावर संबंधित वेतन श्रेणीत सामावून घेतलं जाईल.

****

राज्य लोकसेवा आयोगाची गट क संयुक्त पूर्व परीक्षा येत्या रविवारी घेण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातल्या बारा केंद्रातून दोन हजार ८५० उमेदवार ही परीक्षा देणार आहेत. लातूर जिल्ह्यात १४ उपकेंद्रावर ही परीक्षा होणार असून यासाठी परीक्षा उपकेंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

****

राज्यात आज पुण्यात सर्वात कमी साडे नऊ अंश तर नाशिक इथं दहा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात नांदेड इथं दहा अंश, छत्रपती संभाजीनगर तसंच परभणी इथं साडे दहा अंश, धाराशिव इथं अकरा अंश तर बीड इथं साडे बारा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाल्याचं, हवामान विभागाने कळवलं आहे.

****